# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

## लेखा व वित्त विभाग

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in E-mail – account@pcmcindia.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्र.लेखा/२९/कावि/९१८/२०२३ दिनांक :-१८/०५/२०२३

## परिपत्रक

विषय : सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पामधील तरतूदींच्या वर्गीकरणाबाबत..

सन २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रकास मा.प्रशासक यांचे स्थायी समिती व मा.महापालिका सभेने मंजुरी दिलेली आहे. असे निदर्शनास आले आहे की, अंदाजपत्रकास मंजुरी दिल्यानंतरही काही विभागांनी वाढीव तरतूदीं मिळणेकामी पत्र लेखा विभागाकडे पाठविलेली आहेत. अंदाजपत्रकास मा.महापालिका सभेने अंतिम मंजुरी दिल्यानंतर त्यामध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास मा.स्थायी समिती व मा.महापालिका सभेची मंजुरी घेणे आवश्यक असते. त्यानुसार सर्व संबंधीत विभागांना सुचीत करणेत येते की, चालू आर्थिक वर्षामध्ये अत्यावश्यक भांडवली / महसुली कामांना / लेखाशिर्षाकरीता तरतूदी आवश्यक असल्यास अथवा अंदाजपत्रकामध्ये नविन कामांचा समावेश करावयाचा असल्यास संबंधीत विभागामधील लेखाशिर्षांवर उपलब्ध असलेल्या तरतूदींमधून विभागांतर्गत वाढ – घट / वर्गीकरण प्रस्ताव लेखा विभागामार्फत मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समिती व मा.महापालिका सभेच्या मान्यतेकामी सादर करणेत यावेत. चालू आर्थिक वर्षामध्ये तरतूदीमध्ये अतिरिक्त वाढ आवश्यक असल्यास सुधारीत अंदाजपत्रकामध्ये अतिरिक्त तरतूदींची वाढ प्रस्तावित करणेत यावी. त्याखेरीज तरतूद वाढीसंदर्भात कोणतेही प्रस्ताव लेखा विभागाकडे पाठवू नयेत. सदर परिपत्रकाची नोंद सर्व संबंधीत विभागांनी घेणेत यावी.

**( शेखर सिंह )**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी

प्रति:- सर्व संबंधीत विभाग